गोजो विठ्ठल व सयाजी बलाल कुलकर्णी ता अंबरनाथ यांहीं हकीकत सांगितली कीं, केसवजी देसपांडे निलाजीचे वडील कुलकर्ण करीत होता, ते वेळेस बालाजी त्रिंबक निसिंदा दिवाण तर्फानें होता. साक्ष १

संभूजी रघुनाथ गुमास्ते चौधरी उमर वरसे ६०।६५ वस्ती का भिवंडी यानीं हकीकत सांगितली कीं, निलाजी साबाजी हे खरे आहेत, यांचे वडिलापासोन आपण जाणतो कीं देसपांडे प्रा मुरंजन कुलकर्णी का कल्याण हे खरे, रामाजीचे वडील पेसजी सरकार तर्फानें निसिंदे होते, यासी व कुलकर्णाशी समध नाहीं, निलाजी कुलकर्णी खरे आहेत. साक्ष १

रयेत तांईफेवार का मजकूर

२ मोठपावगी
- १ उसमान पाटल उमर वरसें ६०
- १ आदामजी खोटाल उमर वरसें ८०

१ सेखमहमद चीमखोर सवदागर उमर वरसें ६०।६५

१ हुसूमापेला खरखू उमर वरसें ६०।६५

१ भीकसेट सेटे कासार उमर वरसें ८५

२ सोनार
- १ तान्हाजी उमर वरसें ६०
- १ उवरसेट उमर वरसें ५५

२

१ माणिक भोई उमर वरसें ८०

२ तांबोळी
- १ माहादसेट उमर वरसें ६०
- १ इभराम उमर वरसें ६०

२

१ आलजी सुसे केळेकरी उमर वरसें ५५

१ माहादू बहिरा माली उमर वरसें ७०

१ हिरोजी कुंभार उमर वरसें ५५

१ रतनजी सुरती वाणी गजबाजार उमरवरसें ५०

१ इभरामजी मोकदम सुतार उमर वरसें ७०

१ कान ह्मातरा चांभार उमर वरसें ५५

२ धाक्या व कोल्हा माहार.

सदहूं समस्त रयत का। मा। आणून त्यांस शपत दिधला कीं, सत्य असेल ती साक्ष देणें. त्यावरून, तपसलिवार ज्यांची त्यांनीं साक्ष सांगितली कीं, निलाजींचे वडील कसबियाचे कुल‑कर्णी ठाऊक आहेत, यांचा हकला‑जिमा तेल व पाने व सेव बाजार कसबियावर आहे तो आपण यास देत असतों, याशिवाय दुसरा कुलकर्णी आपणास ठाउक नाहीं, व आपण दुसरियासी कोण्हास हकलाजिमा तेल‑पान दिधलें नाहीं, रामाजीचे वडिल पूर्वीं सरकारतर्फेनें निधिदे होते, नि‑लाजीचे कुलकर्ण का। मा। चें हें आ‑पण जाणतों. येणे प्रमाणें सदहूजणां‑नीं साक्षे दीधली.